**केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१)(ब) नुसार १ ते १७ बाबींची माहिती प्रकाशित करणे. समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर**

**कलम ४(१)(ब) (एक)**
**समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर कार्यालयातील कार्ये व कर्तव्य याचा तपशिल.**

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नाव | :- | समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर. |
| कार्यालयाचा पत्ता | :- | जिल्हा परिषद लातूर. |
| कार्यालय प्रमूख | :- | जिल्हा समाजकल्याण अधिकारी. |
| शासकीय विभागाचे नाव | :- | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई. |
| कोणत्या मंत्रालयीन खात्याच्या अधिनिस्त | :- | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई. |
| कार्यक्षेत्र | :- | जिल्हयाचे ग्रामिण क्षेत्र |
| भौगोलिक | :- | कार्यानुरूप |
| विशिष्ट कार्य | :- | सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना राबविणे. |
| विभागाचे ध्येय धोरण | :- | समाजातील मागासवर्गीय व अपंग घटकांचे जिवनमान उंचावणे. |
| सर्व संबधित कर्मचारी | :- | एकूण वर्ग -३ - १४<br>एकूण वर्ग -४ - ०३ |
| कार्य | :- | मागासवर्गीय व अपंगाचे पुनर्वसन, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृती,आंतरजातीय विवाहीतांना प्रोत्साहन,दलित वस्त्यांना पायाभुत सुविधा,मागासवर्गीयांना वैयक्तिक लाभ योजना व त्यावर संनियंत्रण. |
| कामाचे विस्तृत स्वरूप | :- | मागासवर्गीय मुलांमुलींसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत वसतिगृहे चालविणे, अनु.जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा चालविणे, सर्व प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत निवासी शाळा/कार्यशाळा चालविणे, मागासवर्गीय व अपंग विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीच्या रकमा जमा करणे, सामुहिक विकासाची दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमध्ये विविध विकास कामे हाती घेणे, आंतरजातीय विवाह करणा-या जोडप्यास प्रोत्साहनपर अर्थसहाय मंजूर करणे, जिल्हा परिषद स्वयंसंपादीत उत्पन्नाच्या २० टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे. |
| कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक व | :- | ०२३८२-२५५०९२ |
| कामाच्या वेळा | :- | सकाळी १०.०० ते सायं. ५.४५ पर्यंत. |

**कलम ४(१)(ब) (दोन )**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी ,जिल्हा परिषद ,लातूर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये याचा तपशिल.**

| अ.क्र. | पदनाम | अधिकार |
|---|---|---|
| १ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद लातूर | विभाग/खाते प्रमुख या नात्याने विभागाच्या सर्व कामावर नियंत्रण ठेवणे |
| २ | कार्यालय अधिक्षक (१) | जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प. लातूर यांना कार्यालयीन कामकाजासाठी मदत, विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांकडील कामावर नियंत्रण. |
| ३ | सहाय्यक लेखाधिकारी (१) | विभागातील लेखा विषयक कामे पहाणे व नियंत्रण ठेवणे. |
| ४ | वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता (१) | अपंग व्यक्तीसाठी सल्ला व मागदर्शन अपंगाचे शिक्षण व प्रशिक्षण व पुनर्वसनाची कामे करणे. |
| ५ | सहाय्यक सल्लागार (१) | वरीलप्रमाणे वै.सा.का.यांच्या कामात मदत करणे. |
| ६ | समाज कल्याण निरीक्षक (५) | समाज कल्याण विभागातील राबविण्यात येणा-या योजनांच्या अमलबजावणी बाबतची क्षेत्रीय कामे. |
| ७ | वरिष्ठ लिपीक (२) | नेमून दिलेले कार्यालयीन शाखेची कामे पार पाडणे. |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (१) | नेमून दिलेले कार्यालयीन शाखेची कामे पार पाडणे. |
| ९ | प्रक्षेपक (१) | सिनेप्रोजेक्टर मशिनव्दारे व्यसनमुक्ती प्रचार कार्य अंतर्गत ग्रामिण भागात जनजागृतीसाठी चित्रपट दाखविणे. |
| १० | वाहन चालक (१) | कार्यालयीन वाहन चालविणे. |
| ११ | शिपाई (३) | कार्यालयाची स्वच्छता,संचिकेची ने-आण करणे व इतर सोपवलेली कामे करणे. |

**कलम (४) (१) (ब) (तीन)**

**निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायीत्व निश्चित करून कार्यपध्दतीने.**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | चौकशी प्रकरणे | २ आठवडे | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | - |
| २ | तक्रार प्रकरणे | २ आठवडे | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | - |
| ३ | न्यायालयीन प्रकरणे | ५ दिवस | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | - |
| ४ | भ.नि.नि. अग्रीम,रजा प्रकरणे | १ आठवडा | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | - |
| ५ | माहिती अधिकार प्रकरणे | ५ ते ३० दिवस | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक | - |

**केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१)(ब) (चार )**
**जिल्हा समाजकल्याण अधिकारी ,जिल्हा परिषद ,लातूर कार्यालयातील नमुन्यामध्ये कामाचे प्रकटीकरण**

| अ.क्र. | काम/कार्य | कामाचे प्रमाण | आर्थिक लक्ष (रू.लाखात) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीयांना लोखंडी पत्रे पुरविणे | लोखंडी पत्रे प्रति लाभार्थी-५ एकूण-४९० | १५.०० | ग्रामीण भागातील मागास वर्गीयांची घराची गवती छपरे बदलून घरावर लोखंडी पत्रे घालणे. |
| २ | मागासवर्गीय महिलांना पिकोफॉल यंत्र पुरवणे | पिकोफॉल प्रति लाभार्थी-१ एकूण-५०० | ३०.०० | ग्रामिण भागातील मा.व. महिलांना पिकोफॉल यंत्र पुरवणे |
| ३ | मागासवर्गीय महिलां-साठी मिनी पिठाची गिरणी पुरविणे. | मिनी पिठाची गिरणी प्रति लाभार्थी-१ एकूण-२७९ | ५९.०० | ग्रामीण भागातील मा.व. महिलांसाठी मिनी पिठाची गिरणी पुरविणे. |
| ४ | अपंगांसाठी मिनी पिठाची गिरणी पुरविणे. | मिनी पिठाची गिरणी प्रति लाभार्थी-१ एकूण-७० | १५.०० | ग्रामीण भागातील अपंगांसाठी मिनी पिठाची गिरणी पुरविणे. |

जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प.लातूर कार्यालयातील कामाची कालमर्यादा...............

काम पूर्ण होण्यासाठी प्रत्येक कामाची कालमर्यादा..................

| अ.क्र. | काम/कार्य | दिवस/तास पूर्ण करण्यासाठी | . जबाबदार अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापनाविषयक कामे | २ आठवडे | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | चौकशी प्रकरणे | २ आठवडे | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | तक्रार प्रकरणे | २ आठवडे | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ४ | न्यायालयीन प्रकरणे | ५ दिवस | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ५ | भ.नि.नि. अग्रीम,रजा प्रकरणे | १ आठवडा | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ६ | माहिती अधिकार प्रकरणे | ५ ते ३० दिवस | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक | जिल्हा समाजकल्याण अधिकारी |

**कलम (४) (१) (ब) (पाच)**
**कामाशी संबधित नियम/अधिनियम**

.................................................................................................................................

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती, अधिनियम १९६१.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिंता १९६८.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६४.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९६७ व १९७९.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१.

८. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१.

९. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५.

१०. इतर वेळोवेळी विहीत केलेले नियम.

**कलम (४) (१) (ब) (सहा)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर येथील कार्यालयामध्ये दस्ताऐवजाची वर्गवारी**

| अ.क्र. | विषय | दस्ताऐवजाचा प्रकार (नस्ती रजिस्टर इ.) | सूरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | विविध विषयाच्या संबधात शासनाचे स्थायी आदेश शासन निर्णय,परिपत्रक इ. | नस्ती | कायमस्वरूपी |
| २ | नियम/ अधिनियम | पुस्तके | कायमस्वरूपी |
| ३ | आवक /जावक नोंदवही | रजिस्टर | कायमस्वरूपी |
| ४ | लेखा परिक्षण आक्षेप अनुपालन | नस्ती | ३० वर्षे |
| ५ | न्यायालयीन प्रकरणे | नस्ती | कायम |
| ६ | अधिकाराचे प्रदान | नस्ती | कायम |
| ७ | मालमत्ता नोंदवही | रजिस्टर | कायम |
| ८ | नेमणूका पदोन्नती बदल्या रजा | नस्ती | ३० वर्षे |
| ९ | कर्मचारी सेवा पुस्तिका रजिस्टर | रजिस्टर | ३० वर्षे |
| १० | जेष्टतासूची | नस्ती | १० वर्षे |
| ११ | दौरा दैनंदिनी कार्यक्रम | नस्ती | ५ वर्षे |
| १२ | सेवा निवृत्ती लाभाची नस्ती | नस्ती | १० वर्षे |
| १३ | पात्र ठरलेले सेवा निवृत्ती प्रकरणे | नस्ती | ३० वर्षे |
| १४ | रजा लेखा भ.नि.नि. अग्रीम | नस्ती | ५ वर्षे |
| १५ | विविध योजनांचे अनुदान, अनुदान निर्धारण, इ. देयकाच्या द्वितीय प्रती | नस्ती | ५ वर्षे |
| १६ | नियतकालिके/अहवाल | नस्ती | कालावधी संपेपर्यंत |

**कलम (४) (१) (ब) (सात)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर येथील कार्यालयाच्या परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था.**

.........................................................................................................................

अशा प्रकारची कार्यपध्दती अस्तित्वात नाही.

**कलम (४) (१) (ब) (आठ)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर विभागाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.**

| अ.क्र. | समितीचे नांव | समिती सदस्य संख्या | सभाचे उदिष्टे | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यासाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृतांत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | समाज कल्याण समिती | १२ | दरमहा | महिण्यातून एक वेळेस | नाही | उपलब्ध आहे. |

## समाज कल्याण विभाग,जिल्हापरिषद,लातुर

कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे नांव पदनाम व मुळ वेतन व ग्रेडपे संपर्काची यादी

| अ.क्र | अधिकारी कर्मचा-याचे नांव | पदनाम | मुळ वेतन | ग्रेडवेतन | भ्रमणधनी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.नाईकवाडी एस.डी | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - | - | ९४२१३६०४२५ | अतिरिक्त कार्यभार |
| २ | श्री.कुंभारकर के.एन | का.अधिक्षक | १६१५० | ४२०० | ७३८५३७४७०२ | |
| ३ | श्री.हिबारे व्ही.डी. | स.ले.अ. | १५२८० | ४३०० | ९४२३८५२५३१ | |
| ४ | श्रीमती शेळके एल.जे | वै.सा.का | १२९३० | ४३०० | ८८०६९२४८९२ | |
| ५ | श्री.उईके के.एस. | सहाय्यक सल्लागार | १०५६० | ४२०० | ९१७५५३४७१२ | |
| ५ | श्रीमती भोरे एस.ए | स.क.नि. | १४५३० | ४२०० | ९१५८००२१५० | |
| ७ | श्री.कुंभार डी.जी | स.क.नि. | १३५०० | ४२०० | ९४२०८३१४८२ | |
| ८ | श्री.बिराजदार आर.बी | स.क.नि | ९३०० | ४२०० | ९९२२१५०३११ | |
| ९ | श्री.बनसोडे एम.एच | स.क.नि | १०४४० | ४२०० | ९४२३०२३३३० | |
| १० | श्री.मईग व्हि.एन | वरिष्ठ लिपीक | ८८१० | २४०० | ८८८८९२०४७२ | |
| ११ | - | वरिष्ठ लिपीक | | | | रिक्त पद |
| १२ | श्री.कांबळे एस.एन | कनिष्ठ लिपीक | १७६१० | १९०० | ९७६४१२४८९० | |
| १३ | श्री.देशमुख एस.आर. | क.स.(स्वय.स.) | | | ९४२[illegible]६११९५६ | प्रतिनियुक्ती |
| १४ | श्री.जाधव एन.व्हि | कनिष्ठ सहाय्यक | - | - | ९०९६२८३३९५ | प्रतिनियक्ती |
| १५ | श्री.चव्हाण एन.एन | कनिष्ठ सहाय्यक | - | - | ८८५७०२८३१६ | प्रतिनयुक्ती |
| १६ | श्री.चामे पी.व्ही. | कनिष्ठ लिपीक | - | - | ९४२१६४७८०२ | प्रतिनियुक्ती |
| १७ | श्री.चामवाड ए.बी. | कनिष्ठ लिपीक | - | - | ९७६७४५५०१४ | प्रतिनियुक्ती |
| १८ | श्रीमती जाधवएस.एम | परिचर | ७६८० | १६०० | ९०४९१०३८९० | |
| १९ | श्रीमतीनागटिळक वाय.एस. | परिचर | ६०१० | १३०० | ९७६७३९३४०४ | |

**कलम ४(१) (अकरा)**

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प.लातूर कार्यालयातील मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशिल याची विस्तृत माहिती.**

**योजनेत्तर**

| अ.क्र | योजनेचे नाव | अंदाजपत्रकिय लेखाशिर्ष | आर्थीक तरतूद | प्रत्यक्ष खर्च (अपेक्षित ) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ४ | ५ |
| १ | जि.प. आस्थापना अनुदाने | | | |
| | १) वेतन | २२२५०१३६ | २३.८४ | २३.८४ |
| | २) वेतनेत्तर | २२२५०१३६ | १.०८ | १.०८ |
| २ | जि.प. आस्थापना अनूदाने (जि.स.क.अ.) वेतन | २२२५D०५५ | २.७२ | ३.६२ |
| ३ | जि.प. आस्थापना अनूदाने (जि.स.क.अ.) प्रवास | २२२५D०५५ | ०.०८ | ० |
| ४ | शिक्षण फी परीक्षा फी | २२२५०५३९ | ९.६४ | ९.६४ |
| ५ | माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | २२२५०५३९ | १६.२८ | १६.२८ |
| ६ | ५ वी ते ७ वी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | २२२५०५३९ | ०.२० | ०.६ |
| ७ | वस्तीगृहांना सहाय्यक अनूदाने | २२२५०५३९ | २८०.७० | २८०.७० |
| ८ | औ. प्र. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्याना विद्यावेतन | २२२५३०४६ | ०.५५ | ०.५५ |
| ९ | सफाई उद्योगात असलेल्या पालकांच्या मुलां-ना शिष्यवृत्ती | २२२५३०४६ | ०.६० | ०.०० |
| १० | अस्पृष्यता निवारनार्थ प्रचार | २२२५३१०८ | ०.०२ | ० |
| ११ | दारूबंदी प्रचार व कार्य | २२३५२८०४ | ३.९५ | ३.१५ |
| १२ | अंमली पदार्थ दिन साजरा करणे | २२३५२८१३ | ०.७० | ०.३७ |
| १३ | मा. व. विद्यार्थ्याना शिक्षण फी परीक्षा फी (NP) S T | २२२५१२८६ | ०.४८ | ०.३८ |
| १४ | मा. व. विद्यार्थ्याना शिक्षण फी परीक्षा फी (PLAN) S T | २२२५२०५९ | ० | ० |
| | **एकूण** | | **३४०.८४** | **३४०.२१** |

**योजनांतर्गत**

| अ.क्र | योजनेचे नाव | सांकेतांक क्रमांक | एकूण अर्थसंकल्पीय तरतूद | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ८ |
| १ | शिक्षण फी परीक्षा फी | २२२५०५४८ | १६.०० | १६.०० |
| २ | आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन (केंद्र) | २२२५०६२८ | ६.०० | ६.०० |
| ३ | आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन (राज्य) | २२२५२४६२ | ३.५३ | २.६१ |
| ४ | औ. प्र. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन | २२२५३०२८ | ०.७६ | ०.६२ |
| ५ | सफाई उद्योगात असलेल्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती (राज्य) | २२२५३७८१ | २९.०० | ०.०० |
| ६ | सफाई उद्योगात असलेल्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती (केंद्र) | २२२५३०३७ | २९.०० | ०.०० |
| ७ | दलीत वस्ती सुधारणा | २२२५३०५५ | २८००.०० | १५१०.७७ |
| ८ | माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | २२२५३८४१ | २७.९९ | २७.९९ |
| ९ | ५ वी ते ७ वी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | २२२५३८५२ | ७६.०० | ३९.०४ |
| १० | अनुदानित वस्तीगृहाना परिरक्षण अनुदान | २२२५३८७९ | ४२.४० | ३२.८६ |
| ११ | ८ वी ते १० वी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | २२२५३८६१ | ११९.९८ | ६०.६६ |
| १२ | अनुसूचित जाती  आश्रमशाळा | २२२५३७७२ | २७१.५९ | २३५.७८ |
| १३ | शाहू, फुले, आंबेडकर दलीत वस्ती विकास व सुधारणा अभियान | २२२५३३७८ | ०.०० | ०.०० |
| १४ | गृहनिर्माण सहकारी संस्थांना वित्तीय सहाय्य | २२१६११७६ | ०.०० | ०.०० |
| १ | शिक्षण फी  व परीक्षा फी (Plan) | २२२५८८८१ | ६.०० | २.५० |
| १ | शिक्षण फी  व परीक्षा फी | २२२५०८८९ | ४.१२ | ४.१२ |
| २ | माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | २२२५०८८९ | ३.८९ | ३.८९ |
| ३ | ५ वी ते ७ वी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | २२२५०८८९ | १९.४५ | १९.४५ |
| ४ | वस्तीगृहाना सहाय्यक अनूदाने | २२२५०८८९ | २२.०० | २२.०० |
|  | **एकूण** |  | **३४७७.७१** | **१९८४.२९** |

## कलम (४) (१) (ब) (बारा)
## जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती.

जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत खालीलप्रमाणे अनुदानाच्या योजना राबविण्यात येतात.

१. **अनुसुचित जाती व नवबौध घटकांच्या वस्तीचा विकास करणे (दलित वस्ती सुधार योजना) :-** या योजनेमध्ये गावातील प्रत्येक दलित वस्तीमध्ये सुधारित निकषानुसार किमान १० एवढया लोकसंख्येपासून पुढील लोकसंख्येच्या प्रमाणात त्या त्या वस्तींसाठी पुढीलप्रमाणे निधी दिला जातो. ज्यामध्ये पोहोंच रस्ते,अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण, पाणीपुरवठा, विद्युतीकरण व समाजमंदीर इ.कामे ग्राम पंचायतीमार्फत घेण्यात येतात.

| अ.क्र. | दलित वस्तीची लोकसंख्या | अनुदान रक्कम (लाखात) | अ.क्र. | दलित वस्तीची लोकसंख्या | अनुदान रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | १० ते २५ | २.०० | ४. | १०१ ते १५० | १२.०० |
| २. | २६ ते ५० | ५.०० | ५. | १५१ ते ३०० | १५.०० |
| ३. | ५१ ते १०० | ८.०० | ६. | ३०१ च्या पुढे | २०.०० |

२. **शाहू फूले आंबेडकर दलित वस्ती विकास व सुधारणा अभियान:-** शासन निर्णय दि.७/२/२००६ अन्वये राज्यातील दलित वस्त्यामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचवावे, दलित वस्त्यामध्ये स्वच्छता राहण्यासाठी तेथील रहिवाशांचा सहभाग वाढावा व सामाजिक विषमता नष्ट व्हावी यासाठी हे अभियान दरवर्षी राबविले जाते. या अभियानात ज्या ग्रामपंचायती हिरीरीने सहभागी होवून उत्कृष्ट कार्य करतील अशा ग्रामपंचायतींना पुढीलप्रमाणे रोख पूरस्कार प्रदान करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येतो.

| पुरस्कार स्वरुप | पंचायत समिती स्तर | जिल्हा स्तर | महसुल विभाग स्तर | राज्यस्तर | दलित वस्ती विरहीत ग्राम पंचायत |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम पुरस्कार | २५ हजार | ५ लाख | १० लाख | २५ लाख | २५ लाख |
| द्वितीय पुरस्कार | १५ हजार | ३ लाख | -- | १५ लाख | -- |
| तृतीय पुरस्कार | १० हजार | २ लाख | -- | १२.५ लाख | -- |

३. **मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी देणे:-** या योजनेमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकाचे उत्पन्न लक्षात न घेता सर्व पातळीवर शिक्षण शुल्क व शालांत परीक्षा देण्यासाठी फी देण्यांत येते, त्याकरिता सदर फी ची प्रतिपुर्ती शाळांना करण्यांत येते.

४. **मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृती देणे:-**माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून इ. ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु. ५००/- व इ. ८ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वार्षिक रु. १०००/- प्रमाणे त्या त्या शाळांमधील प्रत्येक इयत्तेमधून मागासवर्गीयातून पहिला व दुसरा असे प्रत्येकी दोन विद्यार्थी याप्रमाणे गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते.

....२

५. **५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृती:-** मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाचा दर्जा उंचवावा व मुली शाळेत नियमित उपस्थित राहाव्यात म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृती वार्षिक रु.६००/- प्रमाणे शैक्षणिक वर्षासाठी दिली जाते.

६. **८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृती:-** इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृती वार्षीक रु.१०००/- प्रमाणे शैक्षणिक वर्षासाठी दिली जाते.

७. **आयटीआय विद्यावेतन:-** शासकिय आयटीआय मध्ये शिकणा-या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.६०/- प्रमाणे प्रशिक्षण कालावधीत विद्यावेतन दिले जाते.

८. **अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृती:-** या योजनेत अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या (उदा. कातडी सोलणे इ.) पालकांच्या १ ली १० वी पर्यंत शिकत असलेल्या पाल्यांना शिष्यवृती दिली जाते. यामध्ये केंद्रस्तर ५० टक्के रु.९२५/- व राज्यस्तर ५० टक्के रु.९२५/- याप्रमाणे एकूण रु.१८५०/- वार्षीक शिष्यवृती दिली जाते.

९. **शालांतपूर्व शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृती:-** या योजनेत इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शालेय शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना उत्पन्नाची मर्यादा विचारात न घेता वर्गनिहाय व प्रवर्गनिहाय शिष्यवृती देण्यांत येते.

१०.**शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृती:-** या योजनेत शालांत परिक्षोत्तर (माध्यमिक शिक्षणानंतरच्या) शिक्षणासाठी, तंत्रशिक्षण व पदवीपर्यंतचे शिक्षण घेणा-या अनिवासी अपंग विद्यार्थ्यांना उत्पन्नाची मर्यादा विचारात न घेता वर्गनिहाय व प्रवर्गनिहाय शिष्यवृती देण्यांत येते.

११.**अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना:-** अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेत वार्षीक रु.१ लाखा पर्यंत उत्पन्न असलेल्या अपंग व्यक्तींना ते करु शकत असलेल्या व्यवसायासाठी प्रकल्प खर्चाची मर्यादा रु. १,५००००/- पर्यंत असून प्रकल्प खर्चाच्या २० टक्के एवढी रक्कम अनुदान व उर्वरित ८० टक्के रक्कम बँकेकडून कर्जरुपात देण्यांत येते.

१२.**आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन व अर्थसहाय्य:-** समाजातील जातीयता नष्ट व्हावी म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबविली जाते. यामध्ये केंद्रस्तर ५० टक्के व राज्यस्तर ५० टक्के हिस्सा याप्रमाणे एकूण रु.५००००/- अर्थसहाय्य विवाहीत जोडप्यांना दिले जाते. या योजनेमध्ये एक व्यक्ती मागासवर्गीय व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदू,लिंगायत,जैन,शीख यांच्यामधील असावा तसेच मागासवर्गीयातील अनु.जाती व जमाती,विमुक्त जाती/भटक्या जमाती यामधील अंतर प्रवर्गामधील आंतरजातीय विवाहीतांनाही लाभ दिलाजातो.

१३.**मागासवर्गीय वसतीगृहांना सहाय्यक अनुदान:-** या योजनेत मागासवर्गीय मुला-मुलींना शिक्षण घेण्यासाठी त्यांची राहण्याची व जेवणाची सोय व्हावी म्हणून सेवाभावी संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या वसतिगृहांना प्रतिविद्यार्थी रु. ९००/- दरमहा याप्रमाणे १० महिन्याचे अनुदान दिले जाते.

....३

**१४.अनुसूचित जातीच्या मुलांना आश्रमशाळा:-** स्वयंसेवी संस्थेमार्फत खाजगी अनुदानित अनुसूचीत जातीच्या आश्रमशाळा चालविण्यांत येत असून यामध्ये अनुसूचीत जातीच्या मुलांना निवासाची व भोजनाची सोय करण्यांत येते, तसेच शैक्षणिक साहित्य पुरविण्यांत येवून त्यांच्या शिक्षणाची सोय केली जाते.

**१५.स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यांत येत असलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांना अनुदान:-** या योजनेत अपंग मुलांची शिक्षणाची सोय आणि त्यांची राहण्याची व जेवणाची सोय व्हावी म्हणून सेवाभावी संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या निवासी अपंग शाळांना प्रतिविद्यार्थी अनुदान दिले जाते. यामध्ये अस्थिव्यंग,मुकबधीर व अंध मुलासाठी दरमहा रु.९००/- व मतिमंद मुलासाठी रु.९३०/- याप्रमाणे १० महिन्याचे अनुदान संस्थेस दिले जाते. जिल्हयातील अपंग शाळा व कार्यशाळांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१६.वृध्द कलाकार/साहित्यीक मानधन:-** शासन निर्णय दि.१ जून २००४ अन्वये वृध्द कलाकार/ साहित्यीक यांना मानधन मंजूर करण्यासाठी जिल्हा स्तरावर समितीची स्थापना केलेली आहे. शासनाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टांप्रमाणे दरवर्षी पात्र लाभार्थींची जिल्हा समितीमार्फत निवड करुन निवड यादी राज्य शासनास सादर केली जाते. ज्यामध्ये जिल्हा स्तर कलाकार/साहित्यीक यांचेसाठी रु.१०००/- राज्यस्तर रु.१२००/- व राष्ट्रीयस्तर रु.१४०० याप्रमाणे मासिक मानधन शासनाकडून मंजूर करुन गट विकास अधिकारी यांचेमार्फत दिले जाते. सद्य:स्थितीत जिल्हा समिती बरखास्त झाल्याने व नविन समिती अस्तित्वात न आल्याने सन २०११-१२ व १२-१३ या वर्षाचे अनुदान प्रस्ताव सादर करणे प्रलंबीत आहे.

**१७.वृध्दाश्रम:-** लातूर जिल्हयात दोन वृध्दाश्रम कार्यरत आहेत. त्यापैकी मातोश्री वृध्दाश्रम येथील प्रवेशितांची मान्य संख्या १०० एवढी आहे. या योजनेचे शासनाकडील अनुदान बंद करण्यांत आले आहे. दुसरे वृध्दाश्रम सर्वसाधारण असून त्याची मान्य संख्या २५ आहे. त्यास दरमहा रु. ९००/- प्रमाणे अनुदान दिले जाते.

**१८.व्यसनमुक्ती केंद्रांना अनुदान:-** व्यसनमुक्ती उपचार तसेच प्रसिध्दी करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय नवि दिल्ली यांच्याकडून अनुदान दिले जाते. लातूर जिल्हयात अश्या दोन संस्था कार्यरत आहेत.

**१९.व्यसनमुक्ती प्रचार :-** या कार्यक्रमामध्ये व्यसनमुक्तीबाबत प्रचार करण्यासाठी शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे समयबध्द कार्यक्रम आयोजित करुन व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यांत येते.

**२०.जि.प.स्वयंसंपादीत उत्पन्नातून घेण्यात येणा-या समाजकल्याण विभागाच्या योजना:-** जिल्हा परिषदेच्या स्वयंसंपादीत उत्पन्नाच्या २०% रकमेतून समाजकल्याण विभागामार्फत सन २०१२-१३ मध्ये खालीलप्रमाणे योजना घेतल्या आहेत.

| अ.क्र | योजना |
|---|---|
| १ | ग्रामीण भागातील मागासवर्गीयांना गवती छपरे बदलून घरावर **लोखंडी पत्रे** घालणे. |
| २ | ग्रामीण भागातील मा.व.महिलांसाठी **मिरची कांडप यंत्र** पुरविणे. |
| ३ | ग्रामीण भागातील अपंगांसाठी **मिरची कांडप यंत्र** पुरविणे. |
| ४ | शालेय मागासवर्गीय **मुलींना सायकल** पुरवठा. |

--@@@--

**कलम (४) (१) (ब) (तेरा)**
**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर विभागातील मिळणा-या सवलती परवाना याची चालू वर्षाची तपशिलवार माहिती.**

.........................................................................................................
.

**अपंग व्यक्तीना ओळखपत्र देणे :-**

या योजने अंतर्गत राज्य परिवहन महामंडळ परिपत्रक क्रमांक राप/वाह/सवलत/अंध/अपंग/५५६/ दिनांक २५ जानेवारी २००१ अन्वये लाभार्थी अंध ,कमी दृष्टी कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, अवयवातील कमतरता, अस्थिव्यंग, मतिमंद इ. अपंग व्यक्तींना ओळखपत्राच्या आधारे सवलत देण्यात येते. तसेच अंध व्यक्ती/विद्यार्थी एकटयाने प्रवास करु शकत नसतील तर त्यांच्या सोबतीस ५० टक्के सवलत समाज कल्याण अधिका-यांनी दिलेल्या अपंग ओळखपत्राच्या आधारे देण्यात येते.

चालू वर्षात सर्व प्रवर्गातील मिळून १३५५ पात्र लाभार्थ्यांना ओळखपत्र वाटप करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थीचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे किमान ४० टक्के अपंगत्वाचे वैद्यकिय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**कलम (४) (१) (ब) (चौदा)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर कार्यालयातील माहितीचे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात माहिती प्रकाशित करणे.**

| **अ.क्र.** | **दस्त ऐवजाचा प्रकार** | **विषय** | **कोणत्या इलेक्टॉनिक नमुन्यात** | **माहिती मिळविण्याची पध्दत** | **जबाबदार व्यक्ती** |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिनेप्रोजेक्टर | व्यसनमुक्ती प्रचार कार्य अंतर्गत ग्रामिण भागातील जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी चित्रपट दाखविणे | सिनेप्रोजेक्टर | ग्रामपंचायती कडून मागणी अर्जानुसार | जिल्हा समाजकल्याण अधिकारी. |
| २ | संगणक संकेतस्थळ | माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४(१) (ब) अन्वये माहिती प्रकाशित करणे. | संगणक संकेतस्थळ | संकेतस्थळा वरून | जिल्हा समाजकल्याण अधिकारी. |

**कलम (४) (१) (ब) (पंधरा)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर कार्यालयातील उपलब्ध सुविधांचा तक्ता प्रसिध्द करणे.**

| अ.क्र. | सुविधांचा प्रकार | वेळ | कार्यपध्दती | ठिकाण | जबाबदार व्यक्ती कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कार्यालय प्रमुखांना भेटण्याची वेळ | सकाळी १२ ते १ व दुपारी ४ ते ५.३० | प्रत्यक्ष | कार्यालय | - |

**कलम (४) (१) (ब) (सोळा)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर कार्यालयातील शासकिय माहिती अधिकारी/सहाय्यक शासकिय माहिती अधिकारी/अपीलीय अधिकारी यांची यादी.**

| अ.क्र. | माहिती/अपीलीय अधिका-यांचे नांव | पदनाम | प्रकार | कार्यक्षेत्र | फोन |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती गाडेकर सी.एन. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी. | प्रथम अपिलीय अधिकारी | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद अंतर्गत लातूर जिल्हा | ०२३८२-२५५०९२ |
| २ | श्री कुंभारकर के.एन. | कार्यालय अधिक्षक | जनमाहिती अधिकारी | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर कार्यालय | ०२३८२-२५५०९२ |
| ३ | श्रीमती जाधव पी.एस. | समाज कल्याण निरीक्षक | सहाय्यक जनमाहिती अधिकारी | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर कार्यालय | ०२३८२-२५५०९२ |

**कलम (४) (१) (ब) (सतरा)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी जि.प.लातूर विभागातील प्रकाशित माहिती.**

..............................................................................................................................

.

१. जिल्हा परिषद लातूर समाज कल्याण विभागाचा वार्षिक प्रशासन अहवाल दरवर्षी तयार करून सामान्य प्रशासन विभागांकडे सादर केला जातो, व तो सामान्य प्रशासन विभागामार्फत एकत्रित प्रकाशित करण्यात येतो.

२. समाज कल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणा-या सर्व योजना, कर्मचारी, त्यांचे वेतन व भत्ते तसेच इतर कार्यालयीन माहिती संकेतस्थळावरून प्रकाशित करण्यात येते.